महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३४ वे | दिनांक : २५/०१/२०२६ | वार : रविवार

## फडणवीस भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत - अंजली दमानिया



**मुंबई :** महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानंतर (ACB) आता सक्तवसुली संचालनालयाच्या (ED) केसमध्येही मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, या निर्णयामुळे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी संताप व्यक्त केला आहे. "छगन भुजबळांवरील सर्व प्रकरणे संपलेली नाहीत, त्यांना कोणतीही क्लीन चिट मिळालेली नाही. आम्ही या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार आहोत," असे त्यांनी सांगितले. तसेच फडणवीस सगळ्या भ्रष्टाचारांना घेऊन पुढे जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया यांनी भुजबळांविरुद्धच्या कायदेशीर लढाईचा पाढा वाचला. त्या म्हणाल्या, “२०१४ साली मी छगन भुजबळांविरोधात जनहित याचिका दाखल केली. एकूण ११ घोटाळ्यांचा त्यात उल्लेख होता. त्यातून तीन गुन्हे दाखल झाले. त्यापैकी दोन प्रकरणांमध्ये दिलासा मिळाला असला, तरी एक महत्त्वाचं प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. कोर्टासमोर संपूर्ण व योग्य माहिती मांडली गेली नाही, त्यामुळे असे निर्णय झाले असावेत.”

अंजली दमानिया यांनी स्पष्ट केलं की, कलिना सेंट्रल लायब्ररी प्रकरण अजूनही प्रलंबित आहे. “या प्रकरणामुळे भुजबळ यांना अद्याप पूर्ण दिलासा मिळालेला नाही. या संपूर्ण प्रकरणावर मी मुख्य न्यायमूर्तीसह देशाचे सरन्यायाधीश आणि मुख्यमंत्री यांना पत्र लिहिणार आहे,” असंही त्यांनी सांगितलं.

दमानिया यांनी यावेळी सत्ताधारी आणि माजी सरकारांवरही गंभीर आरोप केले. “महाराष्ट्र सदन घोटाळ्यात भुजबळ यांना आधी उद्धव ठाकरे सरकारने वाचवलं आणि आता देवेंद्र फडणवीस सरकारने वाचवलं. एसीबीने या प्रकरणात अपील करणं अपेक्षित होतं, मात्र तसं झालं नाही. सगळे एका माळेचे मणी आहेत,” असा आरोप त्यांनी केला.

त्यांनी सांगितलं की, ३१ मार्च २०२२ रोजी ठाकरे सरकारने अपील संदर्भातील शासन निर्णय रद्द केला होता. त्यानंतर एप्रिल २०२३ मध्ये पुन्हा अपील करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला. तरीही महाराष्ट्र सदन घोटाळ्याचं प्रकरण पूर्णपणे संपलेलं नाही, असा दावा त्यांनी केला.

अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार टीका केली. “भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राचा नारा देणारे फडणवीस आज भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत. भाजपची हीच मोडस ऑपरेंडी आहे. आधी आरोप करा, तपास यंत्रणा लावा आणि नंतर त्यांनाच पक्षात सामावून घ्या,” असा आरोप त्यांनी केला. त्यांनी पुढे म्हटलं की, “ईडीच्या आरोपपत्रात सगळे पुरावे आहेत, जबाब नोंदवलेले आहेत. तरीही असा निर्णय येणं दुर्दैवी आहे. सध्या राज्यात केवळ बोली लावण्याचं राजकारण सुरू आहे. फडणवीस यांनी याचं उत्तर महाराष्ट्राला द्यावं.”

या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) ने असा आरोप केला होता की, सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना छगन भुजबळ यांनी कोणतीही निविदा न मागवता ‘के. एस. चामणकर एंटरप्राइजेस’ या कंपनीला कंत्राट दिलं. तसेच सरकारी अधिकाऱ्यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केल्याचा आरोप एसीबीने केला होता. एसीबीच्या मते, संबंधित विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचं दाखवण्यात आलं, मात्र प्रत्यक्षात हा नफा तब्बल ३६५.३६ टक्के असल्याचा दावा करण्यात आला होता.

## सहर शेखचे विधान पक्षाचीच अधिकृत भूमिका - इम्तियाज जलील





**मुंबई :** ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर एमआयएमच्या (AIMIM) नगरसेविका सहर शेख यांनी केलेल्या विधानावरून सुरू झालेला राजकीय गदारोळ थांबण्याचे नाव घेत नाहीये. आता या वादात एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी उडी घेतली असून, त्यांनी सहर शेख यांच्या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे. "सहर शेख यांचे विधान हे केवळ त्यांचे वैयक्तिक मत नसून ती पक्षाचीच अधिकृत भूमिका आहे," असे म्हणत जलील यांनी येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्र 'हिरवा' करणार," असे ते म्हणाले.

सहर शेख या सध्या त्यांच्या वक्तव्यामुळे चांगल्याच चर्चेत आहेत. या वक्तव्यानंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर सहर शेख यांनी माफी देखील मागितल्याचे समोर आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर एआयएमआयएम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी आज मुंब्रात जाऊन नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी एआयएमआयएमच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार देखील केला.

इम्तियाज जलील मुंब्रात आले असता, कार्यकर्त्यांनी त्यांचे भगव्या रंगाची शॉल घालून स्वागत केले. भगवी शॉल गळ्यात ठेवूनत त्यांनी पत्रकार परिषद घेतली. याकडे सर्वांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, "या देशाला रंगांमध्ये वाटले गेले आहे. रंग कोणत्याही एका जातीचा नसतो, पण विशिष्ट मानसिकतेमुळे रंगांना धर्माशी जोडले जाते. आमचा पक्ष सर्वधर्मीयांना सोबत घेऊन चालणारा आहे."

सहर शेख यांना पोलिसांनी दिलेल्या नोटीसवरून जलील यांनी संताप व्यक्त केला. यावेळी त्यांनी भाजप आमदार नितेश राणे यांचा एक वादग्रस्त व्हिडिओ प्ले केला. "नितेश राणे जेव्हा मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतात, तेव्हा त्यांना नोटीस का दिली जात नाही? कायद्याचे निकष फक्त आमच्यासाठीच वेगळे आहेत का? किरीट सोमय्या येतात म्हणून आमच्या नगरसेविकेवर कारवाई होते, हे पोलिसांचे वागणे चुकीचे आहे," असा संताप त्यांनी व्यक्त केला.

## वारंवार शारीरिक संबंध अन् मुलाचा जन्म हे लग्नासारखेच नाते : मुंबई हायकोर्ट



**मुंबई :** उच्च न्यायालयाने एका प्रकरणात सुनावणी करताना वारंवारचे शारीरिक संबंध आणि मुलांचा जन्म हे लग्नासारखेच नाते असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा दिला. कोर्टाने या प्रकरणी एका पुरुषाच्या जोडीदाराने त्याच्याविरोधात दाखल केलेला खटला रद्दबातल करण्यास नकार दिला. तसेच महिला जोडीदाराला पत्नीचा, तर नातेसंबंधांतून जन्मलेल्या मुलीला मुलीचा दर्जा दिला. वारंवार लैंगिक संबंध व मुलाचा जन्म यासह दीर्घकालीन घनिष्ठ संबंध हे महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायद्यांतर्गत विवाहाच्या समतुल्य मानले जाऊ शकतात, असे कोर्टाने या प्रकरणी नमूद केले.

प्रस्तुत प्रकरणात आरोपी व त्याच्या कुटुंबाने चामोर्शीच्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. त्यांनी २०२२ व २०२३ मध्ये त्याच्या जोडीदाराला व त्याच्या अल्पवयीन मुलीला देखभाल भत्ता देण्याचे आदेश रद्द करण्याचीही मागणी केली होती. या प्रकरणात एका २२ वर्षीय तरुणीने आपल्या प्रियकराविरोधात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत खटला दाखल केला होता. न्यायमूर्ती एम एम नेर्लीकर यांनी या प्रकरणी सुनावणी करताना आरोपीविरोधातील खटला रद्द करण्यास नकार दिला. तथापि, आरोपीचे पालक व पत्नीला या प्रकरणातून वगळून त्यांना दिलासा दिला.

महिलेच्या म्हणण्यानुसार, तिचे आरोपीसोबत प्रेमसंबंध होते. दोघे अनेकदा भेटले. त्यांच्यात अनेकदा शारीरिक संबंधही प्रस्थापित झाले. या काळात ती गरोदर राहिली. आरोपीच्या आग्रहाखातर तिने एकदा गर्भपात केला. त्यानंतरही त्यांचे संबंध चालू राहिले. त्यात ती पुन्हा गरोदर राहिली. पण यावेळी तिने गर्भपात करण्यास नकार दिला. तिच्या जोडीदाराच्या आग्रहावरूनही तिने गर्भपात केला नाही. त्यानंतर त्यांना एक गोंडस मुलगी झाली. आई झाल्यानंतर महिलेने आपल्या प्रियकराकडे लग्नाचा तगादा लावला. पण त्याने नकार दिला.

एवढेच नाही तर महिलेशी असणारे संबंध व एका मुलीचा बाप असूनही त्याने २०२२ मध्ये दुसऱ्या एका महिलेशी लग्न केले. यामुळे संतापलेल्या महिलेने ७ मे २०२२ रोजी विविध कायद्यांतर्गत आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

या खटल्याच्या सुनावणीत आरोपीच्या वकिलाने हायकोर्टात युक्तिवाद केला की, केवळ आठवड्याचे शेवटचे दिवस एकत्र घालवणे किंवा वन - नाईट स्टँड असणे हे घरगुती संबंध ठरत नाहीत. त्यांनी असा आग्रह धरला की, ही तक्रार केवळ सूड उगवण्यासाठी दाखल केली होती. त्यामुळे ती फेटाळून लावली पाहिजे. मॅजिस्ट्रेट कोर्टाने तिला दरमहा ५ हजार व तिच्या मुलीसाठी २ हजार अंतरिम देखभालीचा आदेश दिला आहे. पण या प्रकरणी अंतिम कारवाई पूर्ण होईपर्यंत व पुरावे सादर होईपर्यंत आरोपीच्या सध्याच्या याचिकेवर विचार करू नये. या सर्व संबंधांना घरगुती हिंसाचार कायद्याच्या अर्थाच्या आत आणण्यासाठी घरगुती संबंधांच्या व्याख्येचा उदार अर्थ लावणे आवश्यक आहे.

कोर्टाने हा युक्तिवाद ऐकल्यानंतर पुरुषाचे त्यानंतर झालेले लग्न हे सुरुवातीच्या टप्प्यात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत महिलेला संरक्षण नाकारण्याचे कारण असू शकत नाही असे स्पष्ट केले. कोर्ट म्हणाले, सुप्रीम कोर्टाच्या निकालांवर अधीन राहून कोर्टाने असे मानले की, नातेसंबंधांचा कालावधी, लैंगिक संबंधांचे स्वरुप व मुलांची उपस्थिती हे वैवाहिक नातेसंबंधाचे मजबूत निदर्शक आहे. दीर्घकाळ सहवास, लैंगिक संबंध, जबरदस्तीने गर्भपात व त्यानंतर मुलीच्या जन्माबाब महिलेचे विधान सकृतदर्शनी घरगुती संबंध व लग्नासारख्याच नात्याच्या कक्षेत येते. त्यामुळे घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २ (फ) अंतर्गत असे मानले जाऊ शकते की याचिकाकर्ता व त्याच्या जोडीदाराचे लग्नासारखेच नाते होते. कारण, ते बराच काळ एका नात्यात होते. या नात्यातून एका मुलीचा जन्म झाला. त्यामुळे त्यांचे संबंध लग्नासारखेच होते हे स्पष्ट होते, असे कोर्ट म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६

## केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेत स्नेहसंमेलन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील वार्षिक स्नेहसंमेलन मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. मनपा आयुक्त महोदय मा. श्री. जी. श्रीकांत साहेब यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'सिम्फनी बँड' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रभावी सादरीकरणाने कार्यक्रमाची प्रेरणादायी सुरुवात झाली. या स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी प्रभाग क्रमांक 24 मधील सर्व सन्माननीय नगरसेवकांची आवर्जून उपस्थिती लाभली. यावेळी मनपा उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख मा. श्री. अंकुश पांढरे साहेबांची उपस्थित लाभली.यामध्ये मा. श्रीमती गंगुताई भवरेमा. श्री. सुनीलजी जगताप,मा. श्रीमती कमलताई रामचंद्र नरोटे,मा. श्रीमती मुक्ताताई किसन ठुबे,मा. श्री बाबासाहेब डांगे,मा. श्री कमलाकर जगताप, मा. श्री भाऊसाहेब जगताप, तसेच कार्यक्रम अधिकारी मा. श्री. ज्ञानदेव सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेली गाणी, नृत्य, अभिनय, नाट्यछटा व इतर विविध कलाप्रकारांनी उपस्थितांची मने जिंकली.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता व स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन




**उमरगा :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि एन.सी.सी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन दिनांक २२ ते २४ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे आणि डॉ पद्माकर पिटले यांचे हस्ते पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.या उपक्रमाअंतर्गत सशक्त लोकशाहीसाठी जागृत मतदार या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक अनुराधा सोनटक्के यांनी पटकावले, तर द्वितीय पारितोषिक दूधभाते सोनाली आणि तृतीय पारितोषिक प्रियंका इंगळे यांना मिळाले. तर मतदार जनजागृती वर आधारित पोस्टर स्पर्धेत प्रथम पारितोषिक सुरज सुरवसे, द्वितीय पारितोषिक हिना मुल्ला आणि तृतीय पारितोषिक पंकज जमादार यांनी प्राप्त केले. "एक देश - एक निवडणूक" या विषयावर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्रज्वल चव्हाण, द्वितीय पारितोषिक मोरे गणेश आणि तृतीय पारितोषिक अनिशा सुरवसे यांनी मिळवले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सूर्यकांत रेवते आणि डॉ. अजित आष्टे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे यांनी मतदार जनजागृती पर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. लोकशाही प्रक्रियेत तरुणांचा सहभाग वाढावा, मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. ढोबळे डी.बी. यांनी सांगितले. पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. अनिल देशमुख यांनी केले तर आभार डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी मानले.

## नेताजींचे जीवन म्हणजे धगधगते अग्निकुंड - प्रा. उमाकांत कोरे यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर :** - देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नेताजींच्या आयुष्यावर प्रकाश टाकण्यात आला.ध्येय एकच होते ते म्हणजे संपूर्ण भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे. नेताजींनी धगधगत्या अग्निकुंडात उडी घेऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. नेताजींची राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम अभिजात होते. आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून त्यांनी जगभरातून नऊ देशांचे सहकार्य मिळवले. इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी नेताजींनी पाणबुडी आणि होडी मधून २४००० पेक्षा जास्त समुद्री प्रवास केला. तुम मुझे खून दो मै तुम्हे आजादी दूंगा अशी साद देशवासियांना घातली. आज NCC, पोलीस, भूदल,जलसेना, वायुसेना याठिकाणी जय हिंद हे ब्रीदवाक्य आजही वापरले जाते. आजाद हिंद सेनेसोबतच त्यांनी झाशीची राणी रेजिमेंट स्त्रियांसाठी निर्माण केली. चलो दिल्ली चा नारा देऊन इंग्रजांवर त्यांनी आक्रमण केले. अंदमान निकोबार बेट त्यांनी ताब्यात घेतले. म्हणूनच नेताजींचे जीवन म्हणजे धगधगते अग्निकुंड आहे असे प्रतिपादन प्रा. उमाकांत कोरे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य प्रा. अरुण काटे यांनी राष्ट्रपुरुषांची जयंती, पुण्यतिथी साजरी करण्यामागचा हेतू नवीन पिढीसाठी या स्वातंत्र्यसेनानींची देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा कळावी. राष्ट्रपुरुषांच्या देशभक्तीचे संस्कार नवीन पिढीत रुजावे म्हणून अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पर्यवेक्षक प्रा. किरण पतंगे यांनी केले.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात स्नेहसंमेलना निमित्ताने मिसमॅचडे साजरा




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्नेहसंमेलनानिमित्ताने आज मिसमॅच डे साजरा करण्यात आला. या कलाकृतीमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मिसमॅच डे हा एक हलकाफुलका आणि मनोरंजक कार्यक्रम आहे जो लोकांना फॅशन आणि आत्म-अभिव्यक्तीसह मजा करण्यास प्रोत्साहित करतो. न जुळणारे कपडे स्वीकारून आणि इतर काही बाबींचा अवलंब करून व्यक्ती आपली सर्जनशीलता, विनोद आणि अनोखे व्यक्तिमत्त्व या निमित्ताने दाखवू शकतात. या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील असलेल्या कलागुणांचा परिचय झाला. वैष्णवी कांबळे, मानसी काळे, तेजस्विनी महाजन, आकांशा अचलखांब, ईश्वरी पुंड, कृष्णा गवळी, गोवर्धन कान्हेरे, विश्वजित नवले यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेऊन सर्वांचे लक्ष वेधले होते


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६


## नाटक हे अभिनयाचे मूळ माध्यम - नाटककार संजय कोथळीकर



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** चित्रपट, साहित्य, नाटक आणि कथा लेखन ही क्षेत्रे केवळ छंद नसून करिअरची मोठी दारे उघडणारी आहेत. मेहनत, कौशल्य आणि योग्य मार्गदर्शन असेल तर विद्यार्थ्यांना या क्षेत्रात नक्कीच उज्ज्वल भविष्य घडवता येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना योग्य वेळी वाव दिली पाहिजे. प्रत्येकाला जीवनात संधी मिळत असते, या संधीचे सोने करता आले पाहिजे. नाटक हे अभिनयाचे मूळ माध्यम असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार संजय कोथळीकर यांनी केले.मुरूम येथील प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वयंशासन दिन व निरोप समारंभात शुक्रवारी (ता. 23) रोजी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. संजय गिरी, मुरूम शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. स्वयंशासन दिनाचे कला शाखेच्या प्राचार्य प्रतीक्षा गावडे, वाणिज्य शाखेच्या रिया जाने, विज्ञान शाखेच्या वैष्णवी हिरमुखे, कला शाखेच्या उपप्राचार्य माही चव्हाण, वाणिज्य शाखेच्या सुजाता जोशी, विज्ञान शाखेच्या ज्ञानेश्वरी सुरवसे, पर्यवेक्षक रुपाली महामुनी, दिक्षा मुदकण्णा, श्रष्टी कट्टटे, स्नेहल येवले आदी उपस्थित होते. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी संजय कोथळीकर यांचा परिचय प्रा. विश्वजीत अंबर यांनी करून दिला. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी उल्हास घुरघुरे म्हणाले की, विद्यार्थ्यांना गुरुवर्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा कधीही विसर न पडता ते संस्कार, मूल्य घेऊन आयुष्यभर जगून स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव रोशन केले पाहिजे. प्रा. सतिश रामपुरे, प्रा. अजित सूर्यवंशी, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. बिभीषण बंडगर, प्रा. दिपक सांगळे, प्रा. रत्नदीप वाकडे, प्रा. नारायण सोलंकर, प्रा. दयानंद राठोड, प्रा. रेखा उण्णद, प्रा. सरस्वती तपसाळे, प्रा. माधुरी नरगिडे, प्रा. साक्षी महामुनी आदींनी पुढाकार घेतला. स्वयंशासनदिनी विद्यार्थ्यांनी शिक्षक व मुख्याध्यापकांच्या जबाबदाऱ्या सांभाळून शालेय कामकाज यशस्वीरीत्या पार पाडले. विद्यार्थ्यांनी वर्गनियंत्रण, प्रार्थनासभा, उपस्थिती व शिस्त राखण्याची जबाबदारी घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमाकांत महामुनी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी गोटगे तर आभार सायली कांबळे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बोरनारच्या मातीत राष्ट्रप्रेमाचा सुवास; इक्रा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांकडून तिरंग्याला चित्ररुपी सलामी!



**बोरनार :** येथील इक्रा एज्युकेशन सोसायटी संचलित अब्दुल मजीद सालार इक्रा उर्दू हायस्कूलमध्ये गणतंत्र दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'चित्ररंगवा' स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. प्रभारी मुख्याध्यापक आरिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी ज्युनियर आणि सीनियर अशा दोन गटांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला; ज्यात ज्युनियर गटासाठी 'शाळेत जाणारे विद्यार्थी' तर सीनियर गटासाठी 'स्वच्छता अभियान' असे विषय देण्यात आले होते. स्पर्धा प्रमुख फिरोज खान आणि परीक्षक शेख रोशन यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकता व रंगसंगतीचे परीक्षण केले, ज्यामध्ये ज्युनियर गटात इशल नाजिम खान (प्रथम), मंतशा नासिर खान (द्वितीय), व इरम इकबाल पटेल (तृतीय) यांनी, तर सीनियर गटात बुशरा अब्दुल गफूर पटेल (प्रथम), तसमिया आलम पठाण (द्वितीय) आणि आफिया अल्ताफ देशमुख (तृतीय) यांनी यश संपादन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी व देशभक्तीची जाणीव निर्माण होते असे गौरवोद्गार काढले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मजहर खान, सादिक सर, आकिब सर यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जालना महापालिकेतील प्रभाग क्रमांक १ च्या नगरसेवकांचा नागरिकांतर्फे जाहीर सत्कार



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जालना महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ चे नवनिर्वाचित नगरसेवकांचा जिजामाता कॉलनी येथे नागरिकांतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. भास्कर आबा दानवे पाटील, सौ. सुशीलाताई दानवे पाटील, सौ.पद्मा मानधना, सौ. ज्योती सले, श्री कल्याण भदनेकर यांचा नागरिकातर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना नगरसेवक श्री भास्कर आबा दानवे म्हणाले की प्रभाग क्र. १ च्या. विकासासाठी मी कटिबद्ध असून त्याच बरोबर जालना शहराचा विकास साठी सुद्धा प्रयत्न करीत राहीन, सुंदर जालना स्वच्छ जालना ही माझी संकल्पना असून त्याच पद्धतीने शहराची वाटचाल सुरू राहील, शहराचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे, असेही श्री भास्कर आबा दानवे यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन जाधव यांनी केले तर उपस्थित आमचे आभार श्री.चव्हाण यांनी मानलेत.






### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६


## जि. प. आणि पं. स. निवडणुकीत भाजपकडून "कार्यकर्ता" पॅटर्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे.जिल्हा परिषदला राज्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखले जाते.कार्यकर्ता हा पक्षाचा आत्मा असल्याने भारतीय जनता पक्षाने या निवडणुकीत कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा निर्णय घेतला आहे.आलूर जिल्हा परिषद गट माझा 'होम ग्राउंड' असला तरी येथून मी निवडणूक लढवणार नाही,तेथे पक्षाच्या निष्ठावंत व अनुभवी कार्यकर्त्याला उमेदवारी देण्यात आली असल्याची माहिती भाजपचे युवा नेते, जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्ष नेते शरण पाटील यांनी दिली आहे. जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणूक संदर्भात शरण पाटील यांनी शनिवारी (ता.२४) मुरूम येथे माध्यमांशी संवाद साधला.जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत उमरगा व लोहारा तालुक्यात भाजप - शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सामान्य कार्यकर्त्यांना झुकते माप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.ग्रामीण भागात शेती ही अजूनही उपजीविकेचे मुख्य आधार आहे.मात्र शेतापर्यंत पोहचण्यासाठी बारमाही रस्त्यांची अनुउपलब्धता,अतिक्रमणामुळे अरुंद झालेले रस्ते यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी अनेक क्रांतिकारी योजना सुरू केल्या आहेत.याच पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील विकासाच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात विशेषतः उमरगा लोहारा तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली आहेत.या योजनेतून रस्त्यांना मान्यता मिळाली आहे.आतापर्यंत किलोमीटर रस्ते तयार करण्यात आले असून येणाऱ्या काळात शेत तिथे रस्ता करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती देत सर्वाधिक जागा जिंकण्यासाठी महायुतीचे नियोजन सुरू असल्याचे ते म्हणाले.यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले पाणंद रस्ता योजना केवळ वाहतुकीचे साधन न राहता आता राजकीय आणि सामाजिक आणि आर्थिक चर्चेचा केंद्रबिंदु ठरत आहे.ग्रामीण भाग शेतकरी वर्गाशी निगडित असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या राजकारणात शेतकरी केंद्रस्थानी राहणार आहे.यामुळे उमरगा लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत शरण पाटील फाउंडेशन च्या पुढाकाराने सुरू झालेला पाणंद रस्ते योजना प्रभावी मुद्दा ठरणार असल्याचे चिन्ह स्पष्टपणे दिसत आहे.

## जसेच्या तसे भाषांतर करणे म्हणजे अनुवाद नव्हे - डॉ. महादेव खोत




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध उपक्रमांचा भाग म्हणून आयोजित केलेल्या शृंखला व्याख्यानमालेत "अनुवाद लेखन" या विषयावर ते बोलत होते. हिंदीच्या शब्दांचा मराठीत अनुवाद करून शब्दशः केलेले भाषांतर किंवा कोणत्याही भाषेतील विविध शब्दांचा अर्थ लावून रुपांतरण केलेल्या अनुवाद कलाकृतीतून त्या संकल्पनेसह अर्थबोध होत नसून ग्रामीण भागातील विविध शब्दछटाचा सूक्ष्मपणे अभ्यास करून केलेला अनुवादच त्या कलाकृतीला न्याय देऊ शकतो असे प्रतिपादन केले.ते पुढे म्हणाले की, "पोटात कावळे ओरडत आहेत " याचे भाषांतर पेट में कव्वे दौड रहे है, असे करता येत नाही तर पेट में चुहें दौड रहे हैं असेच करावे लागेल तरच तो अनुवाद त्या कलाकृतीला यथोचित न्याय देऊ शकेल, असे सांगून डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी मराठीतील हिंदीत अनुवादित केलेल्या अनेक कलाकृतींचे दाखले देत अनुवाद शास्त्राची इतंभूत माहिती दिली. या व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दस्तगीर पठाण यांनीही आपल्या अध्यक्षीय समारोपात अनुवाद लेखन म्हणजे काय हे सांगून विदेशी किंवा इतर अन्य भाषेतील साहित्य मराठीत वा मराठीच्या सांस्कृतिक आणि भाषिक चौकटीत रूपांतरित करणे , भाषांतरित करणे म्हणजे अनुवादित साहित्य होय. अनुवाद हे एक स्वतंत्र माध्यम आहे. अनुवाद करणे म्हणजे मूळ आशय, भावविभाव, भावना आणि सौंदर्य यांना जाणून केलेला अनुवाद म्हणजेच खरे भाषांतर होय. अनुवाद ही एक स्वतंत्र ज्ञानेशाखा म्हणून आता विकसित होत आहे.वेगवेगळ्या भागात वेगवेगळी संस्कृती असते. तेथील स्थानिक शब्दांना विशिष्ट असा अर्थ चिकटलेला असतो. त्या चिकटलेल्या शब्दांना विविध सांस्कृतिक अर्थ जोडलेले असतात.कोणताही अनुवाद त्या सांस्कृतिक परिघात अनुस्युत असला पाहिजे असे सांगून डॉ.पठाण यांनी अनुवाद हा सुद्धा सृजनशील असला पाहिजे. भावानुवाद व रुपांतरण अचूक झाले पाहिजे.वैविध्यपूर्ण साहित्यप्रकार हाताळता आले पाहिजे. त्यामुळे अभिजात साहित्य आणि नवनवीन ग्रंथ जागतिक पातळीवर जाऊन मराठी भाषेची संपन्नता आणखी दृढ होण्यास मदतच होणार आहे. अनुवादामुळे वाचनीयता वाढते, भिन्न भिन्न संस्कृतीचा मिलाफ होतो असे प्रतिपादन करून अध्यक्षीय समारोप केला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. आसिया चिश्ती केले तर सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागातील प्रा. राजेंद्र पात्रे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा डॉ. विनोद धनेराव यांनी केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103

8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६


## युवकानी उद्योग व्यवसायाकडे वळावे! - युवा उद्योजक श्री. बळीराम गवते



**पाटोदा (प्रतिनिधी) :** युवकानी नौकरीच्या मागे न लागता स्वत:चे उद्योग व्यवसाय सुरू करावेत.उद्योग व्यवसायाकडे वळावे!असे प्रतिपादन बीड जिल्ह्यातील युवा उद्योजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक चे जिल्हाध्यक्ष श्री बळीराम गवते यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर व महाविद्यालयातील व्यवसाय मार्गदर्शन कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "उद्योजकता विकास एक दिवसीय कार्यशाळेत बीज भाषक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की स्पर्धेच्या युगात सर्वानाच नौकऱ्या मिळतीलच याची शाश्वती नाही.आधुनिक काळात अनेक क्षेत्रात नवनविन क्षेत्रात उद्योग, व्यावसायाच्या संधी आहेत. आवडत्या क्षेत्रात व्यसनापासून दूर राहुन उद्योग,व्यवसाय करावेत सर्व बाबीत मदत व मार्गदर्शन करु!असे अश्वासन दिले.या कार्यशाळेचे उदघाटक म्हणुन श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर सुप्रसिध्द शिवव्याख्याते शिवश्री. डॉ. बाळासाहेब पिंगळे, प्राचार्य डॉ. दत्ता ढास, प्रा.डॉ. मनोजकुमार नवसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक, प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम कदम यांनी उदघाटकीय भाषणात या कार्यशाळेचा हेतु सांगुन. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे अहवान केले.या कार्यशाळेत प्रथम सत्रात "कौशल्य विकास" या विषयावर प्रा. डॉ.मनोजकुमार नवसे,तर द्वितीय सत्रात "अर्थिक व्यवस्थापन "या विषयावर प्राचार्य डॉ.दत्ता ढास यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेचे संचलन प्रा.डॉ. शिवाजीराव काकडे, यांनी केले तर प्रस्ताविक व आभार या विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ. श्रीमती कल्पना घारगे यांनी केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद, व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी निवड झाल्यामुळे सत्कार




**उमरगा (मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुक्यातील जकेकूर येथील ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात विठ्ठसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड मुरूमच्या संचालक पदी जकेकूर येथील सौ. रोहिनी विनोद पाटील यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने ग्रामपंचायत सदस्या सौ. उज्वला मल्लीकार्जून स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठल साई चे संचालक तथा धाराशिव जिल्हा भाजपा एस. सी सेल चे जिल्हाअध्यक्ष दिलीप भालेराव होते. याप्रसंगी बोलताना दिलीप भालेराव यांनी विठ्ठलराव पाटील हे गेली २५ वर्षे कारखान्याचे संस्थापक संचालक होते, त्याच्यानंतर त्यांच्या स्नूषा सौ. रोहिणी विनोद पाटील यांना लोकनेते बसवराजजी पाटील यांनी संचालक पदी निवड करून या कुंटुबाच्या निष्टेला न्याय दिला असून, उच्चशिक्षीत असलेल्या व सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या रोहिणी ताई शेतकऱ्यांना न्याय देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही. टी. घोडके यांनी केले. याप्रसंगी सहशिक्षक संतोष कांबळे यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विठ्ठलराव पाटील यांच्या कार्याचा आढावा घेतला. सुत्रसंचालन संजय बिराजदार यांनी तर आभार सहशिक्षक प्रदिप समाने यांनी मांडले. कार्यक्रमासाठी रहेमान जमादार, ग्रामपंचायत सदस्य अंजिक्य पाटील, राजीव गायकवाड, आदित्य पाटील, पटेल नासीर, सचिन जाधव, स्वामी मल्लीनाथ, राम जाधव आदिसह विद्यार्थी उपस्थित होते.

## भरोसा

आता ना भरोसा! कुणाचा राहिला!
गाव हरवला! माणसाचा!!

आता संधीसाधू! आजुबाजू रोज!
लेवुनीया साज! रंगांचीया!!

आता वाटमारी! आणि साठे लोटे
वाटेवर काटे! लपलेले!!

आता साडेसाती! ढेकणे घरात!
बगळे रानात! टपलेले !!

हिरव्या पिकाला ! रोज टोळधाड!
बैलाला गोचीड! लागलेले!!

जरी आरपार! वेदना उरात!
हसणे दारात! ठरलेले!!



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड







# राष्ट्रीय पर्यटन दिन : समावेशक विकासासाठी नाशिक जिल्हा पर्यटन व आदिवासी पाड्यांची भूमिका

**दर**वर्षी 25 जानेवारी रोजी भारतात राष्ट्रीय पर्यटन दिन साजरा केला जातो. पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक विकास, सांस्कृतिक संवर्धन आणि समुदाय सशक्तीकरण कसे घडू शकते, याची जाणीव करून देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. विकसित भारताच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीवर पर्यटन केवळ प्रवास आणि विरंगुळ्यापुरते मर्यादित नसून, ते संतुलित प्रादेशिक विकास, रोजगारनिर्मिती आणि पर्यावरण संरक्षणासाठी एक प्रभावी साधन ठरू शकते. महाराष्ट्रातील सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण असलेल्या नाशिक जिल्ह्यासाठी राष्ट्रीय पर्यटन दिन हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे,ज्यात स्थानिक पर्यटनाचा राष्ट्रीय आकांक्षांशी मेळ कसा घालता येईल, याचा विचार करता येतो. धार्मिक,सांस्कृतीक, नैसर्गिक वारसा आणि वाईन टुरिझमपलीकडे जाऊन नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व समुदाय-केंद्रित पर्यटनाला, विशेषतः आदिवासी पाड्यांना महत्त्वाची संधी आहे. हे पाडे शाश्वत जीवनशैली, स्थानिक खाद्यसंस्कृती आणि अस्सल सांस्कृतिक अनुभवांचे जिवंत केंद्रे बनू शकतात. नाशिक जिल्हा म्हणजे आध्यात्मीक, ऐतिहासिक, नैसर्गिक, शेती आणि आदिवासी संस्कृती यांचे अनोखे मिश्रण आहे. नाशिक शहर कुंभमेळा, त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, बुद्ध लेणी आणि पवित्र गोदावरी नदीसाठी जागतिक पातळीवर ओळखले जाते; मात्र संपूर्ण जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय समृद्ध आहे. डोंगर व निसर्ग पर्यटननासाठी इगतपुरी, भंडारदरा, अंजनेरी डोंगर, धबधबे, ट्रेकिंग मार्ग इत्यादी, तसेच वारसा व धार्मिक पर्यटनामध्ये त्र्यंबकेश्वर, पंचवटी, सप्तश्रृंगी गड, अंजनेरी (हनुमान जन्मस्थान), प्राचीन बुद्ध लेणी इत्यादींचा समावेश होतो. कृषी व वाईन पर्यटनासाठी द्राक्षबागा, फार्म-स्टे, वाईनरी टूर, द्राक्ष महोत्सव इत्यादी पर्यटनस्थळे महत्वाची आहेत. तसेच आदिवासी भागांमध्ये, सुरगाणा, दिंडोरी, पेठ, कळवण हे तालुके आदिवासी बहुल लोकसंकेचे मानले जातात, जिथे मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्यास आहे. हे वैविध्य नाशिक जिल्ह्याला विकसित भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी एक आदर्श प्रयोगशाळा बनवते.नाशिकमधील पर्यटन आणि विकसित भारत विकसित भारत या दृष्टिकोनात समावेशक विकास, पर्यावरणीय शाश्वतता आणि सांस्कृतिक अभिमान या तीन महत्त्वाच्या स्तंभांचा समावेश होतो. पर्यटन या तिन्ही स्तंभांना थेट हातभार लावते.1. समावेशक आर्थिक विकास : नाशिकमधील पर्यटनामुळे आधीच हॉटेल्स, वाहतूक, मार्गदर्शक सेवा, वाईनरी, कारागीर आणि स्थानिक खाद्य व्यवसायांमध्ये हजारो लोकांना रोजगार मिळतो. पर्यटन ग्रामीण भागात विस्तारल्यास, ग्रामीण आणि अदिवासी कुटुंबांसाठी शेतीबाह्य उत्पन्नाचे स्रोत निर्माण होतील. तसेच स्थानिक युवक व महिलांना होम-स्टे, मार्गदर्शक सेवा व हस्तकलेत संधी निर्माण होतील. अदिवासी व दुर्गम भागात सूक्ष्म उद्योजकतेला चालना मिळेल.2. पायाभूत सुविधा आणि जीवनमान : पर्यटनामुळे रस्ते, स्वच्छता, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि सार्वजनिक सुविधांमध्ये गुंतवणूक निर्माण होईल. याचा फायदा केवळ पर्यटकांनाच नव्हे, तर स्थानिक,अदिवासी आणि ग्रामीण नागरिकांनाही होतो.3. सांस्कृतिक व पर्यावरणीय जतन : शाश्वत पर्यटन धोरणांमुळे नाशिकची जंगले, नद्या, टेकड्या आणि ऐतिहासिक स्थळे संरक्षित राहतात. विकसित भारतच्या संकल्पनेत विकास म्हणजे सांस्कृतिक ओळखी नष्ट करणे नव्हे, तर त्यांना भविष्याच्या संपत्तीत रूपांतरित करणे होय. आदिवासी पाडे हे ग्रामीण व समुदाय-केंद्रित पर्यटनाचे केंद्र असून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी पाडे जिथे वारली, कोकणा, भिल्ल, ठाकूर, महादेव कोळी यांसारख्या जमाती राहतात पर्यटनासाठी एक अनमोल ठेवा आहेत.आदिवासी पाडे हे पर्यटनाला कशा प्रकारे चालना देऊ शकतात? ते पुढील प्रमाणे सांगता येईल.1. स्थानिक खाद्यसंस्कृती (आदिवासी भोजन पर्यटन) : आदिवासी आहार हा साधा, पौष्टिक आणि ऋतुनुसार बदलणारा असतो या मध्ये तांदूळ किंवा बाजरीची भाकरी, बांबू कोंबाची भाजी, वन्य पालेभाज्या, कंदमुळे, स्थानिक चटण्या व आंबवलेले पदार्थ, पारंपरिक औषधी पेये इत्यादी. “ट्रायबल फूड ट्रेल्स” शेतातून ताटात (Farm-to-Plate) जेवण, स्वयंपाक प्रात्यक्षिके अशा उपक्रमांमुळे शहरी आणि विदेशी पर्यटक आकर्षित होऊ शकतात. यामुळे अदिवासी व ग्रामीण महिलांच्या बचत गटांना थेट उत्पन्न मिळेल.2. सांस्कृतिक पर्यटन अनुभव : यामध्ये वारली चित्रकला कार्यशाळा,अदिवासी लोकनृत्य व लोकसंगीत संध्याकाळ, तसेच अदिवासी सण-उत्सव आणि जंगल जीवनावरील कथा सांगणे इत्यादी सांस्कृतिक पर्यटनाच समावेश होतो.3. इको-टुरिझम व निसर्गभ्रमण : आदिवासी व ग्रामीण स्थानिक लोक जैवविविधतेचे सखोल ज्ञान ठेवतात, यामुळे प्रशिक्षित स्थानिक मार्गदर्शक निर्माणहोतील. जंगल फेऱ्या,औषधी वनस्पती दर्शन, नदी संवर्धन सहली, काजवे महोत्सव असे अनुभव देऊ शकतात. शाश्वत विकास: मार्गदर्शक तत्त्वे : नाशिकमधील पर्यटन खऱ्या अर्थाने विकसित भारत ला हातभार लावायचे असेल, तर शाश्वत विकास हा पाया असला पाहिजे.1. पर्यावरणीय शाश्वत विकास : त्र्यंबकेश्वर व डोंगराळ भागात पर्यटक संख्येचे नियमन करणे, प्लास्टिकमुक्त पर्यटन क्षेत्र तयार करणे, सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, इको-फ्रेंडली होम-स्टे इत्यादींचा समावेश होऊ शकतो.2. सामाजिक शाश्वत विकास : यामध्ये पर्यटन उद्योगात समुदाय मालकी, न्याय्य मजुरी व कौशल्य प्रशिक्षणसांस्कृतिक शोषण टाळणे यांचा समावेश होतो.3. आर्थिक शाश्वत विकास : यामध्ये अदिवासी व ग्रामीण स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करणे, पर्यटन सहकारी संस्था व बचत गट स्तापन करणे तसेच डिजिटल बुकिंग प्लॅटफॉर्मशी जोडणी करणे आवशक आहे.समावेशक विकासासाठी धोरणात्मक समन्वय व स्थानिक कृती : नाशिकचा पर्यटन आराखडा खालील योजनांशी जोडता येईल, यामध्ये स्वदेश दर्शन, ग्रामीण होम-स्टे योजना, स्किल इंडिया व स्टार्टअप इंडिया, वनहक्क कायद्याशी सुसंगत इको-टुरिझम यासाठी जिल्हा प्रशासन, वन व आदिवासी विकास विभाग, पर्यटन उद्योजक, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामसभा यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे.शाश्वत विकास भविष्यासाठी दिशा: योग्य नियोजन झाले तर नाशिक जिल्हा हा राष्ट्रीय आदर्श पर्यटन जिल्हा ठरू शकतो, जिथे धार्मिक पर्यटन, वाईन पर्यटन व इको-टुरिझम यांचा समतोल होत असून शहरवासीयांचा ग्रामीण भारताशी थेट संवाद होत आहे. आदिवासी भागातील युवा व महिलांचे सशक्तीकरण होत असून पर्यटनातून समावेशक विकास होणे अपेक्षित आहे. सारांशरूपाने असे म्हणता येईल की राष्ट्रीय पर्यटन दिन हा केवळ उत्सव नाही, तर समावेशक राष्ट्रनिर्मितीचा संदेश आहे. नाशिकसाठी विकसित भारताशी पर्यटन जोडणे म्हणजे पारंपरिक पर्यटन मर्यादांपलीकडे जाऊन ग्रामीण, आदिवासी व समुदाय-केंद्रित पर्यटनाला, विशेषतः आदिवासी पाड्यांना, केंद्रस्थानी आणणे होय. स्थानिक खाद्यसंस्कृती, जंगल ज्ञान आणि सांस्कृतिक परंपरा दाखवून नाशिक जिल्हा पर्यटकांना अर्थपूर्ण अनुभव देऊ शकतो आणि एकाच वेळी आपल्या सर्वांत वंचित समुदायांना सशक्त करू शकतो. अशा प्रकारे नाशिक जिल्हा शाश्वत, समावेशक आणि स्थानिक अभिमानावर आधारित विकासाचा आदर्श नमुना ठरू शकतो.-

**सुजाता भिमाशंकर मोरे**
(पर्यटनशास्त्रातील संशोधक आहेत.)
ईमेल sujata.more२१०३@gmail.com

# जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजपचा बिनविरोध पॅटर्न

**सिंधुदुर्ग** : महापालिका निवडणुकीनंतर आता भाजपने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. विरोधी पक्षांच्या उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे भाजपचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २ उमेदवार बिनविरोध जिल्हा परिषदेवर पोहोचलेत. यामुळे भाजपचे निवडणुकीपूर्वीच खाते उघडले आहे.

महापालिका निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचे जवळपास ७० नगरसेवक निवडून आले होते. त्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. या प्रकरणी त्यांनी भाजप बिनविरोध उमेदवार निवडून आणून संसदीय लोकशाहीच संपवत असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी आरोप प्रत्यारोप सुरू असताना आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही भाजपने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे. भाजपने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीपूर्वीच सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत आपले २ उमेदवार बिनविरोध निवडून आणून विजयाचे खाते उघडले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, भाजपने खारेपाटण जिल्हा परिषद गटातून प्राची इस्वलकर यांच्या माध्यमातून पहिली बिनविरोध निवड केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या येथील उमेदवार मीनल तळगावकर यांनी आज अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे प्राची इस्वलकर यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. दुसरीकडे, बांदा जिल्हा परिषद गटातून भजाप उमेदवार तथा माजी सभापती प्रमोद कामतही जिल्हा परिषदेवर बिनविरोध पोहोचलेत. या गटात अपक्ष उमेदवार सुशांत पांगम यांनी माघार घेतल्यामुळे कामत बिनविरोध निवडून आलेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समित्या निवडणुकांसाठी अर्ज मागे घेण्याची शेवटीच मुदत २७ जानेवारीची आहे. त्यामुळे त्याच दिवशी या निवडणुकांचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे. पण तोपर्यंत भाजप प्रतिस्पर्धी उमेदवाराला अर्ज मागे घेण्यास भाग पाडून या निवडणुकीतही सर्रासपणे बिनविरोध पॅटर्न राबवताना दिसून येत आहे. दरम्यान, राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

प्रस्तुत निवडणुकीत ७१ ते ७५ निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ९ लाख, तर त्या अंतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ६ लाख रुपये खर्च मर्यादा आहे. तसेच ६१ ते ७० निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ७ लाख ५० हजार, तर त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ५ लाख २५ हजार रुपये खर्च मर्यादा असणार आहे. याशिवाय ५० ते ६० निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ६ लाख व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांसाठी ४ लाख ५० हजार रुपये खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने आखून दिली आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६

# आरक्षण: सामाजिक न्यायाचे साधन की विवादाचे कारण?

**भा**रतीय लोकशाहीच्या वाटचालीत आरक्षण हा केवळ धोरणात्मक मुद्दा नसून तो सामाजिक न्यायाच्या संघर्षाचा आरसा आहे. स्वातंत्र्यानंतर देशाने समानतेचा मार्ग स्वीकारला, पण शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक विषमतेचे ओझे एका रात्रीत उतरवणे शक्य नव्हते. त्यामुळेच संविधानाने आरक्षणाची तरतूद करून वंचित, दुर्बल आणि मुख्य प्रवाहाबाहेर ढकलल्या गेलेल्या समाजघटकांना संधी देण्याचा प्रयत्न केला. आरक्षणामागील मूळ हेतू अन्यायाची भरपाई करणे आणि समान संधी उपलब्ध करून देणे हाच होता.मात्र आज, सात दशकांहून अधिक काळानंतर, आरक्षण हा विषय पुन्हा एकदा तीव्र चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. एकीकडे आरक्षणामुळे अनेक पिढ्यांचे जीवनमान उंचावल्याचे वास्तव आहे, तर दुसरीकडे त्याचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारीही दुर्लक्षित करता येत नाहीत. गुणवत्तेचा प्रश्न, वाढती स्पर्धा, आर्थिक विषमता आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे आरक्षणाबाबत समाजात मतभेद तीव्र झाले आहेत. त्यामुळे 'आरक्षण अजूनही गरज आहे का?', 'ते फक्त राजकीय साधन बनले आहे का?' की 'बदलत्या परिस्थितीत ही काळाची अपरिहार्य मागणी आहे?' असे प्रश्न स्वाभाविकपणे उभे राहतात. या पार्श्वभूमीवर आरक्षणाकडे भावनिक नव्हे, तर वास्तववादी आणि संवेदनशील दृष्टीने पाहण्याची गरज आहे. सामाजिक समतेच्या ध्येयाशी प्रामाणिक राहून या धोरणाचे आत्मपरीक्षण करणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.'आरक्षणामागील मूळ उद्देश' आरक्षणामागील मूळ उद्देश समजून घेतल्याशिवाय या संकल्पनेचे योग्य मूल्यमापन करता येत नाही. भारतीय समाजव्यवस्था शतकानुशतके विषमतेवर आधारलेली होती. जात, जन्म आणि सामाजिक दर्जा यांवरून काही समाजघटकांना शिक्षण, रोजगार, सत्तास्थाने आणि मानवी प्रतिष्ठा यांपासून दूर ठेवण्यात आले. या ऐतिहासिक अन्यायाचे परिणाम पिढ्यान्पिढ्या भोगावे लागले. स्वातंत्र्यानंतर संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले असले, तरी प्रत्यक्षात समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक होत्या. त्यातूनच आरक्षणाची संकल्पना पुढे आली. आरक्षणाचा पहिला आणि महत्त्वाचा उद्देश म्हणजे सामाजिक अन्यायाची भरपाई करणे. केवळ कायद्याने समानता जाहीर करणे पुरेसे नसून वंचित घटकांना शिक्षण व नोकरीत प्रत्यक्ष संधी मिळणे गरजेचे होते. आरक्षणाद्वारे अनुसूचित जाती, जमाती व मागासवर्गीय समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुसरा उद्देश म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित करणे. प्रशासन, शिक्षणसंस्था आणि लोकप्रतिनिधित्वात विविध समाजघटकांचा सहभाग वाढावा, निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज ऐकू यावा आणि आत्मसन्मानाची जाणीव निर्माण व्हावी, हा त्यामागचा विचार होता. त्यामुळे आरक्षण हे कोणतीही सवलत नसून सामाजिक न्याय साध्य करण्यासाठीचे घटनात्मक साधन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.'आरक्षणाची आजची गरज (समर्थक बाजू)' आरक्षणाची गरज आता संपली आहे, असा दावा वारंवार केला जातो; मात्र सामाजिक वास्तव पाहिले असता तो पूर्णतः स्वीकारता येत नाही. संविधान लागू होऊन अनेक दशके उलटली असली, तरी भारतीय समाजातील सामाजिक व आर्थिक विषमता आजही ठळकपणे दिसून येते. ग्रामीण भागातील मोठा वंचित वर्ग, मागास समाजघटक आणि आदिवासी समुदाय अजूनही शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधींपासून दूर आहेत. अशा परिस्थितीत आरक्षण ही केवळ ऐतिहासिक तरतूद न राहता आजही आवश्यक असलेली सामाजिक उपाययोजना ठरते. आजही अनेक ठिकाणी जातीय भेदभाव, अस्पृश्यतेचे अप्रत्यक्ष स्वरूप आणि संधींमधील असमानता अनुभवास येते. स्पर्धात्मक परीक्षांमध्ये किंवा उच्च शिक्षणात समान प्रारंभबिंदू नसताना सर्वांकडून समान अपेक्षा ठेवणे अन्यायकारक ठरते. आरक्षणामुळे वंचित घटकांना स्वत:ची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश करता येतो. आरक्षणामुळे केवळ व्यक्ती नव्हे, तर संपूर्ण समाजघटक उन्नत होतो, हे गेल्या काही दशकांत सिद्ध झाले आहे. शिक्षण व नोकरीत संधी मिळाल्याने अनेक कुटुंबांचे जीवनमान उंचावले, आत्मसन्मान वाढला आणि पिढ्यान्पिढ्यांचा दारिद्र्याचा साखळा तुटू लागला. तसेच प्रशासन व निर्णयप्रक्रियेत विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व वाढल्याने लोकशाही अधिक सर्वसमावेशक झाली आहे.म्हणूनच आरक्षणाला फक्त सवलत किंवा अन्यायकारक धोरण म्हणून न पाहता, सामाजिक समतेकडे नेणारे साधन म्हणून पाहणे आवश्यक आहे. जोपर्यंत समाजात संधींची खरी समानता निर्माण होत नाही, तोपर्यंत आरक्षणाची गरज संपली आहे असे म्हणणे वास्तवाशी विसंगत ठरेल.'आरक्षणाचा गैरवापर (टीकात्मक बाजू)' आरक्षणाचा उद्देश सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा असला, तरी अलीकडच्या काळात या व्यवस्थेचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. आरक्षणाचा लाभ समाजातील सर्वात दुर्बल घटकांपर्यंत पोहोचण्याऐवजी अनेकदा तो काही विशिष्ट वर्गांपुरताच मर्यादित राहतो, ही गंभीर बाब आहे. तथाकथित 'क्रीमी लेयर'मधील लोक शिक्षण, संपन्नता आणि संधी असूनही आरक्षणाचा फायदा घेताना दिसतात, त्यामुळे खऱ्या गरजू घटकांना संधी नाकारली जाते. तसेच आरक्षणाचा वापर सामाजिक सुधारणेपेक्षा राजकीय साधन म्हणून होण्याचे प्रकार वाढले आहेत. निवडणूक लाभासाठी नव्या आरक्षणांची आश्वासने दिली जातात, समाजातील असंतोष भडकवला जातो आणि आरक्षणाचा मुद्दा मतांच्या राजकारणात अडकतो. परिणामी, आरक्षणाचा मूळ हेतू मागे पडतो. याशिवाय, सतत वाढणाऱ्या आरक्षणामुळे गुणवत्ता आणि कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होतात. समान स्पर्धा न राहिल्याने काही ठिकाणी असंतोष व विभाजनाची भावना निर्माण होते. विशेषतः तरुणांमध्ये आरक्षणामुळे संधी हिरावल्या जात असल्याची भावना वाढीस लागली आहे.या सर्व बाबी आरक्षण व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करतात. त्यामुळे आरक्षण संपूर्णपणे नाकारण्याऐवजी त्यातील गैरवापर थांबवणे, लाभांचे न्याय्य वितरण सुनिश्चित करणे आणि धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे, हेच खरे आव्हान आहे.'आर्थिक निकष व बदलती परिस्थिती' भारतीय समाजरचना वेगाने बदलत असताना आरक्षणाच्या चौकटीतही बदल अपेक्षित ठरतात. सुरुवातीला आरक्षणाचा आधार प्रामुख्याने सामाजिक मागासलेपणा होता; मात्र आज केवळ जातीय विषमतेपुरतीच समस्या मर्यादित राहिलेली नाही. वाढती बेरोजगारी, शिक्षणाचा वाढता खर्च आणि आर्थिक असमानता यामुळे अनेक घटक, जातभेदापलीकडे जाऊन, संधींपासून वंचित राहू लागले आहेत. त्यामुळे आरक्षणात आर्थिक निकषांचा विचार होणे ही काळाची गरज ठरू लागली आहे. आज अशा अनेक कुटुंबांचा समावेश गरीब वर्गात होतो, जे सामाजिकदृष्ट्या पुढारलेले मानले जात असले तरी आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षण व रोजगाराच्या संधींपासून दूर राहतात. अशा परिस्थितीत केवळ जातीय आधारावर धोरण ठरवणे अपुरे ठरते. आर्थिक निकषांवर आधारित आरक्षणामुळे या वंचित घटकांना न्याय मिळण्याची शक्यता निर्माण होते.मात्र आर्थिक निकषांचा स्वीकार करताना सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सामाजिक भेदभाव अजूनही अस्तित्वात असल्याने आर्थिक निकष हे सामाजिक आरक्षणाला पर्याय नसून त्याची पूरक व्यवस्था म्हणून पाहिले पाहिजेत. 'समान संधी' ही लोकशाहीची खरी कसोटी असून, त्यासाठी बदलत्या परिस्थितीनुसार लवचिक व संतुलित धोरणांची गरज आहे. आजचा प्रश्न आरक्षण असावे की नसावे हा नसून, ते अधिक न्याय्य, समावेशक आणि परिणामकारक कसे होईल, हा आहे.'तरुणाई आणि आरक्षण' आजची तरुणाई ही देशाच्या भविष्याची खरी शिल्पकार आहे; मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर तीव्र मतभेदही याच वर्गात अधिक दिसून येतात. वाढती स्पर्धा, मर्यादित रोजगार संधी आणि गुणवत्तेवर आधारित अपेक्षा यामुळे अनेक तरुणांना आरक्षणामुळे अन्याय होत असल्याची भावना निर्माण होते. विशेषतः खुल्या प्रवर्गातील तरुणांमध्ये असंतोष वाढत असल्याचे चित्र दिसते. दुसरीकडे, वंचित समाजातील तरुणांसाठी आरक्षण ही संधीची दारे उघडणारी व्यवस्था ठरते. समान प्रारंभबिंदू नसताना समान स्पर्धा अपेक्षित ठेवणे हेच अन्यायकारक ठरते, ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. आरक्षणामुळे या तरुणांना आत्मविश्वास मिळतो आणि ते मुख्य प्रवाहात सहभागी होऊ शकतात. मात्र अपुरी माहिती, भावनिक मांडणी आणि राजकीय प्रभावामुळे तरुणाईत गैरसमज वाढत आहेत. त्यामुळे आरक्षणावर संघर्षाऐवजी संवाद, संवेदनशीलता आणि वस्तुनिष्ठ विचारांची गरज आहे. सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा समतोल राखत तरुणाईने या प्रश्नाकडे पाहणे, ही काळाची गरज आहे.'पुढचा मार्ग (उपाय व सुधारणा)' आरक्षणाबाबत वाढत चाललेले मतभेद आणि असंतोष लक्षात घेता, या व्यवस्थेचे आत्मपरीक्षण करणे अत्यावश्यक आहे. आरक्षण संपूर्णपणे नाकारण्याऐवजी त्यात आवश्यक सुधारणा करून ते अधिक न्याय्य व परिणामकारक बनवणे, हाच पुढचा मार्ग ठरू शकतो. सर्वप्रथम, आरक्षण धोरणाचे नियमित आणि पारदर्शक पुनरावलोकन केले गेले पाहिजे, जेणेकरून त्याचा लाभ खऱ्या गरजू घटकांपर्यंत पोहोचेल. 'क्रीमी लेयर'ची अंमलबजावणी अधिक कठोर करणे आवश्यक आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या घटकांनी आरक्षणाचा लाभ पुढील पिढ्यांसाठी सोडणे, हा सामाजिक जबाबदारीचा भाग असायला हवा. तसेच शिक्षणाच्या प्राथमिक स्तरापासून गुणवत्तापूर्ण व समान संधी उपलब्ध करून दिल्यास आरक्षणावरील ताण कमी होऊ शकतो. आरक्षणासोबत कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणसुधारणांवर भर देणे गरजेचे आहे. आरक्षण हे एकमेव उपाय नसून, ते व्यापक सामाजिक सुधारणा प्रक्रियेचा एक भाग आहे, ही जाणीव धोरणकर्ते आणि समाज दोघांनीही ठेवली पाहिजे.'निष्कर्ष' आरक्षण हा प्रश्न केवळ समर्थन किंवा विरोधाच्या चौकटीत बंदिस्त करून चालणार नाही. तो भारतीय समाजातील ऐतिहासिक विषमता, सामाजिक न्याय आणि समान संधी या मूलभूत मूल्यांशी जोडलेला आहे. आरक्षणामुळे अनेक वंचित घटक मुख्य प्रवाहात आले, हे नाकारता येत नाही; मात्र त्याचवेळी त्यातील त्रुटी, गैरवापर आणि असमान वितरण याकडेही डोळेझाक करता येणार नाही. त्यामुळे आरक्षण संपूर्णपणे रद्द करणे किंवा अंध समर्थन करणे, हे दोन्ही टोकाचे दृष्टिकोन ठरतात. आज गरज आहे ती संतुलित, संवेदनशील आणि वास्तववादी धोरणांची. सामाजिक समता हे अंतिम ध्येय ठेवून आरक्षणाकडे साधन म्हणून पाहिले गेले पाहिजे. जोपर्यंत समाजातील संधींची खरी समानता प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत आरक्षणावर चर्चा नव्हे, तर सुधारणा हाच योग्य निष्कर्ष ठरतो.



**लेखक : डॉ नामदेव वैजनाथ कचरे**
भूगोलशास्त्र विभाग
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २५ जानेवारी २०२६

# भारतीय संविधान, सद्यस्थिती आणि आपण : ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आत्मपरीक्षण

26 जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत गौरवशाली, अर्थपूर्ण आणि आत्मपरीक्षणाची संधी देणारा दिवस आहे. 1950 साली याच दिवशी भारतीय संविधान अंमलात आले आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून औपचारिकरीत्या अस्तित्वात आला. 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण केवळ ध्वजारोहण, संचलन, भाषणे आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता संविधानाचा आत्मा, आजची सामाजिक-राजकीय-आर्थिक सद्यस्थिती आणि या सगळ्या प्रक्रियेत 'आपण' म्हणजे सामान्य नागरिक म्हणून आपली भूमिका व जबाबदारी यांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन हा उत्सवाइतकाच तो अंतर्मुख होण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि नव्या संकल्पांची बांधिलकी स्वीकारण्याचा दिवस आहे.भारतीय संविधानाचा जन्म हा अचानक घडलेला ऐतिहासिक योगायोग नव्हता. त्यामागे शेकडो वर्षांचा सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, जातीय विषमता, स्त्री-पुरुष असमानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या लढ्याचा दीर्घ इतिहास दडलेला आहे. ब्रिटिश राजवटीखाली भारत केवळ राजकीयदृष्ट्या गुलाम नव्हता, तर सामाजिकदृष्ट्याही तो अंतर्गत विसंगतींनी, रूढी-परंपरांच्या जोखडाने आणि दारिद्र्याने ग्रासलेला होता. स्वातंत्र्यलढा हा केवळ सत्ता हस्तांतराचा संघर्ष नव्हता, तर तो माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवण्याचा व्यापक लढा होता. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि नैतिकतेच्या बळावर या लढ्याला दिशा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेला संविधानिक अधिष्ठान दिले.संविधान सभेने जवळपास तीन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चाललेल्या सखोल चर्चांमधून भारतीय संविधानाची निर्मिती केली. जगातील विविध लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या बहुविध वास्तवाचा विचार करून हे संविधान घडवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने तयार केलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून भारतीय समाजाच्या आशा-आकांक्षा, संघर्ष, वेदना आणि स्वप्नांचा जिवंत दस्तऐवज आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानाची चार मूलभूत मूल्ये आजही भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा आणि दिशा ठरवणारी शक्ती आहेत.प्रजासत्ताक ही संकल्पना केवळ राष्ट्रप्रमुख निवडणुकीद्वारे निवडला जातो इतक्यापुरती मर्यादित नाही. प्रजासत्ताक म्हणजे सत्ता एखाद्या व्यक्तीकडे किंवा राजघराण्याकडे न राहता लोकांकडे असणे, कायद्यापुढे सर्व समान असणे आणि निर्णयप्रक्रियेत जनतेचा सक्रिय सहभाग असणे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देऊन प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिला. शिक्षण, संपत्ती, जात, धर्म किंवा लिंग यांचा विचार न करता मतदानाचा हक्क देणे ही लोकशाहीच्या इतिहासातील क्रांतिकारी पायाभरणी होती. मात्र लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सजग, चिकित्सक आणि जबाबदार नागरिकत्वात रूपांतरित होणे आवश्यक आहे.संविधानाने दिलेले मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकांचे संरक्षणकवच आहेत. समानतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे अधिकार नागरिकांना सन्मानाने जगण्याची हमी देतात. परंतु आजच्या सद्यस्थितीत या हक्कांचा वापर करताना अनेकदा त्यांचा गैरवापर, संकुचित अर्थ लावणे किंवा राजकीय हेतूसाठी विकृतीकरण होत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून विवेकाने व्यक्त होण्याची क्षमता होय, हे आपण पुन्हा-पुन्हा लक्षात घेतले पाहिजे.आजची आर्थिक आणि सामाजिक सद्यस्थिती पाहिली असता भारत प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जात असतानाच अनेक अंतर्विरोधांना सामोरे जात आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होत आहे. मात्र या प्रगतीसोबत आर्थिक विषमता वाढताना दिसते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून मध्यमवर्गीयांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, असंघटित कामगारांचे प्रश्न हे आजही गंभीर स्वरूप धारण करून समाजासमोर उभे आहेत.ग्रामीण आणि शहरी भारतातील असमतोल विकास ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो, तर शहरी भागात स्पर्धा, असुरक्षितता, ताणतणाव आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. स्थलांतरामुळे झोपडपट्ट्यांची वाढ, पर्यावरणीय ताण आणि सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होत आहे. संविधानाने सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा आणि अडथळे दिसून येतात.सामाजिक पातळीवर जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, असहिष्णुता आणि द्वेषमूलक प्रवृत्ती वाढताना दिसतात. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेची हमी दिली असली तरी सामाजिक वास्तवात अजूनही भेदभाव, अन्याय आणि शोषण पूर्णपणे संपलेले नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना अजूनही हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक असमानता या समस्या प्रजासत्ताकाच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.राजकीय सद्यस्थितीचा विचार करता लोकशाही प्रक्रियेत झालेले बदल प्रकर्षाने जाणवतात. निवडणुका नियमितपणे होत असल्या तरी राजकारणात पैसा, प्रचारयंत्रणा, सोशल मीडिया आणि भावनिक मुद्द्यांचे वाढते वर्चस्व चिंताजनक ठरत आहे. संसदीय चर्चा, धोरणात्मक पारदर्शकता आणि लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्व या बाबी दुर्लक्षित होत असल्याची भावना निर्माण होते. लोकशाही केवळ सत्तांतराची प्रक्रिया नसून ती सतत जागरूक राहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि संवाद साधण्याची व्यवस्था आहे, हे आपण विसरता कामा नये.शिक्षण व्यवस्था ही संविधान आणि सद्यस्थिती यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सुशिक्षित, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. मात्र आज शिक्षण अधिकाधिक बाजाराभिमुख, स्पर्धात्मक आणि गुणकेंद्रित होत चालले आहे. संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, नैतिकता आणि मानवी संवेदना यांचे शिक्षण दुय्यम ठरत आहे. युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव, संविधानाची ओळख आणि सामाजिक जबाबदारी रुजवणे ही काळाची गरज आहे.स्त्री सक्षमीकरणाचा प्रश्न हा संविधान आणि सद्यस्थिती यांतील अंतर स्पष्टपणे अधोरेखित करतो. संविधानाने स्त्री-पुरुष समानतेची हमी दिली असली तरी प्रत्यक्षात स्त्रियांना सुरक्षितता, समान संधी आणि सन्मान मिळवण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो. शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकारण आणि निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढत असला तरी सामाजिक मानसिकता बदलणे ही खरी गरज आहे. स्त्री सक्षमीकरण हा केवळ महिलांचा प्रश्न नसून तो संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला विषय आहे.आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती आणि इतर वंचित घटकांच्या प्रश्नांकडे पाहिले असता विकासाच्या मुख्य प्रवाहात ते अनेकदा मागे पडलेले दिसतात. जमिनीचे हक्क, जंगलावरचा अधिकार, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी याबाबत अजूनही मोठी दरी आहे. संविधानाने दिलेल्या संरक्षणात्मक तरतुदी प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे राबवल्या जात आहेत, हा गंभीर आत्मपरीक्षणाचा प्रश्न आहे. समतामूलक समाजनिर्मितीसाठी या घटकांचा विकास केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.डिजिटल युगातील भारत ही आजची एक महत्त्वाची सद्यस्थिती आहे. तंत्रज्ञानामुळे शासन अधिक पारदर्शक झाले, सेवा सुलभ झाल्या आणि माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. मात्र त्याचवेळी खोटी माहिती, अफवा, द्वेषमूलक भाषण, ट्रोल संस्कृती आणि सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण यांचा धोका वाढला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखणे हे आजच्या लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. सजग डिजिटल नागरिकत्व ही आजच्या प्रजासत्ताकाची नवी गरज बनली आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर 'आपण' म्हणजे सामान्य नागरिकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. संविधान हे केवळ सरकार किंवा न्यायालयांसाठी नसून ते प्रत्येक नागरिकासाठी आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अनेकदा आपण समस्या फक्त सरकारकडे ढकलतो, पण नागरिक म्हणून आपली भूमिका, कर्तव्ये आणि सहभाग याकडे दुर्लक्ष करतो.लोकशाही टिकवायची असेल तर नागरिकांनी प्रश्न विचारणे, माहिती घेणे, विवेकपूर्ण चर्चा करणे आणि सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. निष्क्रिय नागरिकत्व हे लोकशाहीसाठी घातक ठरते. सामाजिक सलोखा, सहिष्णुता, संवाद आणि बंधुता या मूल्यांची जोपासना आपल्या रोजच्या आचरणातून झाली तरच संविधान जिवंत राहील. मतभेद असू शकतात, पण ते द्वेषात किंवा हिंसेत रूपांतरित होऊ नयेत, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.जागतिक पातळीवर भारताची भूमिका वाढत असताना संविधानिक मूल्यांचा आधार घेणे अत्यंत गरजेचे आहे. शांतता, सहअस्तित्व आणि मानवतावादी दृष्टिकोन ही भारताची ओळख राहिली आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीतील संकल्पना आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत अधिकच सुसंगत ठरते. आपण जर आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहिलो तर, भारताचा प्रजासत्ताक अनुभव जगासाठी मार्गदर्शक ठरू शकतो.77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संविधान, सद्यस्थिती आणि आपण यांचा एकत्रित विचार करताना हे स्पष्ट होते की संविधानाने आपल्याला दिशा दिली आहे, सद्यस्थिती आपल्याला प्रश्न विचारायला भाग पाडते आणि 'आपण' या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची, बदल घडवण्याची आणि लोकशाही मजबूत करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. संविधान जिवंत ठेवायचे असेल तर ते केवळ ग्रंथालयात किंवा कायद्याच्या पुस्तकात नव्हे, तर आपल्या विचारात, वर्तनात आणि कृतीत उतरवावे लागेल.शेवटी असे म्हणता येईल की भारतीय प्रजासत्ताक हे केवळ एक राजकीय व्यवस्था नसून ते एक व्यापक सामाजिक करार आहे. हा करार टिकवण्याची जबाबदारी सरकारइतकीच नागरिकांचीही आहे. संविधानाचे मूल्य, आजचे वास्तव आणि उद्याचे स्वप्न यांचा समतोल साधत जर आपण पुढे गेलो, तरच भारत खऱ्या अर्थाने समतामूलक, सशक्त, लोकशाहीवादी आणि मानवतावादी राष्ट्र बनेल. 26 जानेवारी हा दिवस आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रजासत्ताक हा केवळ साजरा करण्याचा नव्हे, तर रोज जगण्याचा, जपण्याचा आणि पुढील पिढ्यांसाठी अधिक मजबूत करण्याचा संकल्प आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल - bagate.rajendra५@gmail.com